तरुण भारत
Akola Main | 2024-08-14 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# महागाव येथे सायबर सुरक्षाविषयक कार्यशाळा

**अकोला** : महागाव येथील गांधी आश्रमशाळा सायबर सुरक्षेबाबत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी सार्थक ठाकरे आणि सक्षम लोडम या सायबर वॉरियर्सनी ऑनलाइन फसवणूक, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाईटस कशा ओळखाव्या या विषयी मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष मुख्याध्यापक सोनोवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक व सर्व शाळेचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

Powered by iDocuments